# जिल्हाधिकारी कार्यालयात ई-सुनावणी

## नागरिकांचा वेळ, पैसा व श्रम वाचणार

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या अपील प्रकरणांवर ई-सुनावणी प्रक्रियेला अपर जिल्हाधिकारी यांच्या दालनात प्रारंभ करण्यात आला आहे. या माध्यमातून जमीन व मालमत्तेशी संबंधित वाद, हक्क नोंदणी, फेरफार, उताऱ्यावरील दुरुस्ती तसेच मालकी हक्काच्या प्रकरणांवर आता ऑनलाईन पद्धतीने सुनावणी होणार आहे. ई सुनावणीमुळे महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी होण्यास मदत होणार आहे.

शासनाकडून संपूर्ण महसूल व्यवस्थेला डिजिटायझेशनच्या दिशेने नेत, पेपरलेस व पारदर्शक प्रशासन देण्याचा प्रयत्न केला जात आहे. ई-सुनावणी ही नवीन संकल्पना सामान्य नागरिकांसाठी हितकारक आहे. यातून महसूल प्रकरणांवरील निर्णय जलदगतीने होऊन कामकाजात अधिक आणि सुसूत्रता येईल. येत्या काळात तालुका कार्यालयांमध्येही ही सेवा कार्यान्वित करण्यात येणार असून, नागरिकांना त्यांच्या घरी बसूनच न्याय मिळवण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले. आता पक्षकारांना तसेच विधिज्ञांना जिल्हाधिकारी कार्यालयात वारंवार येण्याची गरज नाही. ई-सुनावणी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेतली जाणार असल्याने घरबसल्या आपले म्हणणे मांडता येईल. यामुळे वेळ, प्रवासाचा खर्च व श्रम वाचण्यास मोठी मदत होणार आहे.शिवाय पारदर्शकपणे आणि वेळेत निर्णय देणे यामुळे शक्य होणार असल्याचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यावेळी म्हणाले.

# कृषिमंत्री कोकाटेंना मुख्यमंत्र्यांचा चाप

## बदल्यांचे अधिकार स्वतःकडे घेतले; कृषी आयुक्तांनाही बदल्यांचे अधिकार

उद्धव ढगे-पाटील

**मुंबई–** कृषी खात्यातील अधिकाऱ्यांच्या मध्यावधी बदल्या तसेच कृषी संचालकांच्या नियतकालिक बदल्यांचे अधिकार स्वतःकडे घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना चाप लावला आहे. याशिवाय सामान्य राज्य सेवा गट अ आणि ब, महाराष्ट्र कृषी सेवा गट अ आणि ब (कृषी उपसंचालक, तालुका कृषी अधिकारी), सामान्य राज्य सेवा गट अ आणि ब आदी संवर्गातील नियतकालिक बदल्यांचे अधिकार कृषी आयुक्तांना देण्यात आले आहेत. कृषी विभागाने गुरुवारी याबाबतचा शासन निर्णय जारी केला. या निर्णयाच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांनी कोकाटे यांच्या बदल्यांचे अधिकार मर्यादित केले आहेत.

वादग्रस्त विधाने करून नव्यानव्या वादाला निमंत्रण देणारे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांना अलीकडेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समज दिली होती. आता देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाने कृषी विभागाने खात्यातील अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबतचे धोरण स्पष्ट केले आहे. काही संवर्गातील अधिकाऱ्यांच्या मध्यावधी बदल्यांसाठी कृषी मंत्री सक्षम प्राधिकारी असले तरीही गट अ दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करताना मुख्यमंत्र्यांची मान्यता घेणे आवश्यक राहील, असे शासन निर्णयात नमूद केले आहे.

शासन निर्णयानुसार कृषी सहसंचालक आणि अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या नियतकालिक बदल्यांचे अधिकार कृषी मंत्र्यांना देण्यात आले आहेत. मात्र, या दोन्ही पदांच्या मध्यावधी बदल्यांचे अधिकार मुख्यमंत्र्यांना असणार आहेत. सामान्य राज्य सेवा गट अ आणि ब, महाराष्ट्र कृषी सेवा गट अ आणि ब (कृषी उपसंचालक, तालुका कृषी अधिकारी), सामान्य राज्य सेवा गट अ आणि ब आदी संवर्गातील मध्यावधी बदल्यांचे अधिकार कृषी मंत्र्यांना असतील, असे निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे. तर गट क कर्मचाऱ्यांच्या नियतकालिक बदल्यांचे अधिकार विभागीय कृषी सहसंचालक आणि गट ड कर्मचाऱ्यांच्या जिल्हा अंतर्गत बदल्यांचे अधिकार जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आणि विभागाअंतर्गत कृषी सहसंचालकांना असणार आहेत.

**पीक उत्पादन खर्च कमी करण्यासाठी समिती**

दरम्यान, राज्यातील शेतकऱ्यांचा पीक उत्पादन खर्च काही प्रमाणात कमी करण्यासाठी पिकाच्या पेरणीपासून ते कापणीपर्यंत मजुरीवर होणाऱ्या खर्चापैकी ५० टक्के खर्च मनरेगामधून अदा करण्यासंदर्भात अभ्यास करुन राज्य सरकारला अहवाल सादर करण्यासाठी समिती स्थापन करण्यात येईल. सदर समितीने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन मजुरीच्या खर्चाचा मनरेगामध्ये समावेश करण्याबाबत राज्य सरकारकडून केंद्र सरकारला प्रस्ताव सादर करण्यात येईल. अशी माहिती कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी आज मंत्रालयात आयोजित बैठकीत बोलताना दिली

# राज्य सेवा मुख्य परीक्षा पुढे ढकलली

**पुणे (प्रतिनिधी)–** राज्य सेवा मुख्य परीक्षेच्या अर्जातील त्रुटींमुळे परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी करण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुकारलेल्या लढ्याला अखेर यश आले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) परीक्षेची सुधारित तारीख जाहीर केली आहे. यापूर्वी दि. २६ ते २८ एप्रिल या कालावधीत होणारी परीक्षा आता दि. २७ ते २९ मे या कालावधीत होणार आहे. त्यामुळे मुख्य परीक्षेसाठी पात्र उमेदवारांना दिलासा मिळाला.

पूर्व परीक्षेतून पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना ईडब्लूएस अथवा ओपनमधून एसईबीसी अथवा ओबीसी हा सुधारित पर्याय ऑनलाइन अर्जामध्ये नमूद करण्यात आलेला नव्हता. त्यामुळे वेळेत अर्ज करू न शकल्याने पात्र विद्यार्थ्यांनी परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी केली होती. ही मागणी आयोगाने फेटाळून लावत निर्धारित वेळापत्रकानुसार परीक्षा घेण्याचे जाहीर केले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी पुण्यात आंदोलन करत सरकारचे लक्ष वेधले. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (श.प.)चे अध्यक्ष खासदार शरद पवार, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यासह राजकीय, सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींकडे न्याय मिळवून देण्याची मागणी केली होती. अखेर गुरुवारी (दि. १७) रोजी आयोगाने प्रसिद्धिपत्रकाद्वारे सुधारित तारीख जाहीर केली आहे. मुख्य परीक्षा आता दि. २७ ते २९ मे या कालावधीत होणार असल्याने विद्यार्थ्यांना अर्ज करण्यास पुरेसा वेळ मिळणार आहे.

एसईबीसी अथवा ओबीसी प्रवर्गातील विकल्प निवडण्याच्या गोंधळामुळे विद्यार्थी अर्जच करू शकले नाहीत. आयोगाने दि. १२ मार्च रोजी पूर्व परीक्षेचा निकाल जाहीर केला. त्यानंतर दि. २९ मार्च रोजी सुधारित निकाल जाहीर केला होता. याबाबत आयोगाकडे विद्यार्थ्यांनी निवेदने सादर केली होती. या निवेदनांच्या आधारे सुधारित तारीख जाहीर केल्याचे आयोगाकडून कळविण्यात आले आहे.

# मुंडेंची चांगली वाणी बंद पडलीय.. सर्वांनी प्रार्थना करा- नामदेव शास्त्री

**बीड–** संत भगवानबाबा गडाचा नारळी सप्ताहाची सांगता बीडच्या शिरूर कासार तालुक्यातील पिंपळनेर येथे झाली. नारळी सप्ताहाची सांगता समारंभात भगवानबाबा गडाचे महंत नामदेव शास्त्री यांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले होतं. यावेळी आपल्या कीर्तनातून नामदेव शास्त्री यांनी धनंजय मुंडे यांची पाठराखण केल्याचे पाहायला मिळाले.



धनंजय मुंडे यांच्या गालावरून वारं गेलं आहे. चांगली वाणी बंद पडलेली आहे. त्यामुळे मुंडे यांच्यासाठी सर्वांनी प्रार्थना करण्याचं आवाहन नामदेव शास्त्री यांनी केलं आहे. इतकंच नाहीतर ते पुढे असेही म्हणाले की, पहिल्या पदावर येऊन धनंजय मुंडे यांच्या हातून समाजकल्याण घडावं, तर भगवानबाबा जेव्हा मारतात तेव्हा त्यांच्या काठीचा आवाज येत नाही. भगवानगडाशी छेडछाड करु नका, असं नामदेव शास्त्रींनी म्हटलंय. दरम्यान, नामदेव शास्त्रींचा रोख नेमका कुणाकडे याची सध्या चर्चा होत आहे.

# पालकमंत्री उद्या घेणार टंचाई आढावा बैठक

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात गेल्या महिनाभरात उन्हाचा वाढलेला तडाखा व निर्माण झालेली पाणी टंचाईवर यावर आणखी प्रभावी मात करण्यासाठी, उपाययोजना करण्यासाठी उद्या शनिवारी (दि.१९) रोजी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली टंचाई आढावा बैठक होणार आहे.

दरम्यान, नगर जिल्ह्यात सध्या २६ गावे आणि १४६ वाड्या वस्त्यांवर पाणी टंचाई निर्माण झाली आहे. या ठिकाणी पावणे पाच लाख नागरिकांना ६४ सरकारी व खासगी पाण्याच्या टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. पुढील काळात जिल्ह्यात पाणी टंचाईची तीव्रता वाढणार आहे. यामुळे त्यावर उपाययोजना करण्यासाठी पालकमंत्री विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नगरला जिल्हाधिकारी कार्यालयात टंचाई आढावा बैठक घेण्यात येणार आहे. जिल्ह्यात गेल्या वर्षी सरासरीच्या १४० टक्के पाऊस झाल्यानंतरही उन्हाचा कडाका वाढल्याने पाणी टंचाईच्या झळा वाढतांना दिसत आहे. तालुका पातळीवर पाण्याचे टँकर सुरू करण्यासाठी दिरंगाई होवू नयेत, यासाठी जिल्हाधिकारी यांनी यापूर्वीच टँकर मंजूरीचे अधिकार प्रांताधिकारी यांना बहाल केलेले आहेत. यासह टंचाईवर मात करण्यासाठी ६४ कोटींचा आराखडा तयार करण्यात आला असून याशिवाय अन्य उपाययोजनांवर उद्याच्या बैठकीत निर्णय होणार आहे. यामुळे या बैठकीला महत्व आहे.

## जालिंदर महाराज यात्रोत्सवाची आज महाआरतीने सांगता

**ताहाराबाद (वार्ताहर)–** राहुरी तालुक्यातील ताहाराबादच्या बेलकरवाडी येथील जालिंदरनाथ महाराजांच्या यात्रोत्सवाला प्रारंभ झाला असून आज शुक्रवारी सांगता होणार आहे.

आज शुक्रवार दि. १८ एप्रिल रोजी श्री संत कवी महिपती महाराज देवस्थानचे मठाधिपती अर्जुन महाराज तनपुरे, केदारेश्वर निवासी लक्ष्मण महाराज पांचाळ, बाळकृष्ण महाराज कांबळे, भगवान महाराज यमगर व राधेश्याम महाराज आहेर यांच्या हस्ते महाआरती होऊन उत्सवाची सांगता होईल.

# कोल्हार खुर्द येथे दुकान फोडून चोरी

**राहुरी (प्रतिनिधी)–** अज्ञात भामट्यांनी किराणा दुकानाची भिंत फोडुन दुकानातील सामानाची उचकापाचक करुन रोख रक्कम व महागाच्या वस्तू चोरुन नेल्याची घटना राहुरी तालुक्यातील कोल्हार खुर्द येथे दि. १५ एप्रिल रोजी सकाळी उघडकीस आली आहे.

जयेश अनिल शिरसाठ (वय १९) हे राहुरी तालुक्यातील कोल्हार खुर्द येथे राहत असून त्यांचे कोल्हार खुर्द गावात ग्रामपंचायतीजवळ किराणा दुकान आहे. दि. १४ एप्रिल रोजी रात्री ९.१५ वाजेच्या सुमारास जयेश शिरसाठ हे नेहमी प्रमाणे दुकान बंद करुन घरी गेले होते. दि. १५ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता जयेश शिरसाठ यांचे वडील दुकान उघडुन आत गेले असता, त्यांना दुकानातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. रात्रीच्या सुमारास अज्ञात भामट्यांनी दुकानच्या मागील भिंत फोडुन दुकानात प्रवेश केला. दुकानातील सामानाची उचकापाचक केली. आणि दुकानातील रोख रक्कम व काजु, बदाम व तुपाचे एक ते दोन किलो वजनाचे डब्बे असा मुद्देमाल चोरून नेल्याचे शिरसाठ यांच्या लक्षात आले. जयेश अनिल शिरसाठ यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात गु.र. नं. ४१९/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (अ), ३३१ (६) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.

# डॉ. सतिश कोठारी यांचे निधन



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** शहरातील डॉ. सतिश घेवरचंदजी कोठारी (वय ६३) यांचे सागरी संथारा व्रतामध्ये निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, चार भाऊ, दोन मुली, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

येथील ज्येष्ठ पत्रकार रमेश कोठारी, कांतीलाल, रतीलाल, विजय, अतुल व ललित कोठारी यांचे ते बंधू तर सौ. पूजा राहुल रांका व सौ. आरती गौरव बोरा यांचे ते वडील होत.

# शाळेतील शिपाईपदच केले बाद; यापुढे पगारावर नव्हे, मानधनावर असणार शिपाई

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती करण्याचा निर्णय शालेय शिक्षण खात्याने घेतला, पण त्यात लिपिक संवर्गातील व प्रयोगशाळा सहाय्यक एवढीच पदे आहेत. शिपाई पद (चतुर्थश्रेणी) व्यपगत तथा कायमचे रद्द केल्याने शाळांमधील शिक्षकेतर कामे करायची कोणी, असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यावर पर्याय म्हणजे शैक्षणिक संस्थांना दरवर्षी शासनाकडून मिळणाऱ्या वेतनेतर अनुदानातून मानधनावर शिपाई भरण्याचा अधिकार संस्थांना आहे.

राज्यातील अनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये साधारणतः २५ हजार शिपाई आहेत, त्यातील अनेकजण निवृत्तीच्या उंबरठ्यावर आहेत तर काहीजण पदोन्नतीस पात्र आहेत. जिल्ह्यात विनाअनुदानित अनुदानित खासगी प्राथमिक व माध्यमिक आणि कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या ३६४ इतकी आहे. त्याठिकाणी अंदाजे पाचशे ते साडेपाचशे शिपाई आहेत, पण शासनाच्या यापूर्वीच्या निर्णयानुसार शैक्षणिक संस्थांना शाळेतील शिपाई सेवानिवृत्त झाल्यावर पुन्हा वेतनावर शिपाई भरता येणार नाही.

शासनाकडून संस्थांना मिळणारे वेतनेतर अनुदान देखील दरवर्षी पुरेशा प्रमाणात मिळत नाही. त्यामुळे शिक्षकेतर कामे करण्यासाठी संस्थापकांना त्यांच्या खिशातील पैशातून कंत्राटी शिपाई भरावे लागणार आहेत. दुसरीकडे शिपाई म्हणून आपल्याला संस्था भविष्यात अनुदानित पदावर कायम करेल म्हणून अनेक वर्षांपासून कार्यरत कर्मचाऱ्यांची आशा कायमची मावळली आहे.

**खाजगी शाळांना करावी लागेल आता नेमणूक**

राज्य शासनाने २०२० मध्ये शिपाई पद भरू नका, असे भरल्यास हे पद व्यपगत होईल असे सुचवले होते. परंतु आता पदच बाद झाल्याने शिपाई भरता येणार नाही. खाजगी संस्थांनी आपल्या अनुदानातून शिपायाची नेमणूक करावी लागेल, असे माध्यमिक शिक्षणाधिकारी दिग्रसकर यांनी सांगितले

**लेखी शपथपत्र घेणे आता बंधनकारक**

शासन स्तरावरून शाळांमधील शिपाई पद कायमचे बाद करण्यात आले आहे. त्यामुळे खासगी अनुदानित शैक्षणिक संस्थांना शासनाकडून मिळणाऱ्या वेतनेतर अनुदानातून किमान आठ हजार मानधन देऊन कंत्राटी शिपाई भरता येईल. पण, अशा कर्मचाऱ्यांची नेमणूक करताना त्यांच्याकडून मी भविष्यात कायम करण्याची मागणी करणार नाही असे लेखी शपथपत्र संस्थांना घ्यावे लागणार आहे.

पान १ वरुन

## शेअर बाजारात प्रचंड तेजी

घसरला होता, तर निफ्टी २३,३५० च्या आसपास व्यवहार करत होता. मात्र, त्यानंतर दुपारच्या सत्रात दोन्ही निर्देशांकांनी जबरदस्त उसळी घेतल्याचे पाहायला मिळत आहे.

## हिंदी भाषा सक्तीला कडाडून विरोध

गेला पाहिजे. अगदी इतर राज्यात राहणाऱ्या मराठी जनांनी त्या राज्याची भाषा आपली मानली पाहिजे हा आमचा आग्रहच आहे. पण हे सोडून या देशाची भाषिक परंपराच खिळखिळी करणार असाल तर ते आम्हाला मान्य नाही. आम्ही हिंदू आहोत पण हिंदी नाही आहोत. महाराष्ट्रावर हिंदीकरणाचा मुलामा द्यायचा प्रयत्न कराल तर महाराष्ट्रात संघर्ष अटळ आहे. या सगळ्याकडे पाहिलं तर लक्षात येतं की सरकार हा संघर्ष मुद्दामून घडवत आहे. येणाऱ्या आगामी निवडणुकांमध्ये मराठी विरुद्ध मराठीतर असा संघर्ष घडवून स्वतःचा फायदा काढून घेण्यासाठी हा सगळा अट्टाहास सुरु आहे? या राज्यातील मराठीतर भाषिकांनी पण सरकारचा हा डाव समजून घ्यावा. त्यांना तुमच्या भाषेबद्दल विशेष प्रेम आहे असं काही नाही. त्यांना तुमची माथी भडकवून स्वतःची राजकीय पोळी भाजून घ्यायची आहे, असा आरोपही त्यांनी केला आहे.

महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी भाषा शिकण्याची सक्ती इथे खपवून घेतली जाणार नाही. शालेय अभ्यासक्रमातील हिंदीची पुस्तकं दुकानांमध्ये विकू दिली जाणार नाहीत आणि शाळांना देखील ती पुस्तकं विद्यार्थ्यांना वाटू दिली जाणार नाहीत, याची नोंद शाळा प्रशासनाने घ्यावी. उद्या सर्व राज्यांमध्ये मराठी भाषा पहिली पासून शिकवाल का? नाही ना? मग ही जबरदस्ती इथेच का? हा मुद्दा ताणू नये असं माझं सरकारला आवाहन आहे. पण या आवाहनाला आव्हान देणार असाल आणि हिंदी लादणार असाल तर मात्र संघर्ष अटळ आहे. ज्याला फक्त सरकारच जबाबदार राहील. त्यामुळे सरकारने लोकभावनेचा आदर करत हा निर्णय मागे तात्काळ घेण्याचे आदेश द्यावेत, असे आवाहनही राज ठाकरे यांनी केले आहे.

**मराठी भाषिकांच्या अस्मितेवर घाला– वडेट्टीवार**

संघराज्य निर्मितीच्या वेळी भाषेला प्राधान्य देताना राज्यांची मातृभाषा मान्य केली गेली. महाराष्ट्राची मातृभाषा मराठी आहे. मराठीसह इंग्रजी या दोन भाषा शिक्षण आणि प्रशासनात वापरल्या जातात. अशा परिस्थितीत तिसरी भाषा म्हणून हिंदी सक्तीने लादणे म्हणजे मराठीवर अन्याय आहे. मराठी भाषिकांच्या अस्मितेवर घाला आहे, अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

जर तिसरी भाषा हवीच असेल, तर ती पर्यायी असावी. पण ती सक्तीची करणे हा एकप्रकारे केंद्रातून राज्यांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न आहे, जो संघराज्य व्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांना धरून नाही. काही राज्यांनी याला विरोध केला आहे. विरोध करणाऱ्या राज्यांना धमकावले जात असून ही चिंता वाढवणारी बाब आहे. मराठी अस्मिता आणि भाषिक अधिकार रक्षणासाठी ही सक्ती तात्काळ मागे घेतली पाहिजे, अशी मागणी वड्डेटीवार यांनी केली आहे.

**संपर्कसूत्र तयार करण्यासाठी हिंदी भाषा– देवेंद्र फडणवीस**

नवीन शैक्षणिक धोरण हे आपण यापूर्वीच लागू केले आहे. कोणताही नवीन निर्णय आपण घेतलेला नाही. महाराष्ट्रात प्रत्येकाला मराठी भाषा आली पाहिजे, हा आपला आग्रह आहे. त्यासोबत देशात एक संपर्कसूत्र तयार करण्यासाठी हिंदी ही एक संपर्कसुत्राची भाषा आहे. ही भाषा देखील लोकांनी शिकली पाहिजे असा प्रयत्न आहे. परंतु, कुणालाही इंग्रजी किंवा अन्य भाषा शिकता येईल आणि त्यासाठी कुठलीही मनाई नाही, असा खुलासा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

**राज ठाकरेंनी आधी अभ्यास करावा मग बोलावे– आशिष शेलार**

शालेय शिक्षणात हिंदीला अनिवार्य भाषा करण्यास विरोध करणाऱ्या राज ठाकरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आधी अभ्यास करावा. त्यासाठी त्यांना आम्ही राष्ट्रीय शिक्षण धोरणाची प्रत पाठवू. पूर्ण अभ्यास केल्यानंतरच त्यांनी याबाबत बोलावे, अशी प्रतिक्रिया सांस्कृतिक कार्यमंत्री आणि मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार यांनी दिली आहे. मुंबईत मराठी भाषेला मान-सन्मान मिळालाच पाहिजे. मराठीला तुच्छ लेखण्याचे पाप कोणी करू नये. मराठीचा सन्मान होईल याची काळजी राज्य सरकार घेत आहे, असेही शेलार म्हणाले.

## वक्फ कायद्यावर केंद्राला ७ दिवसांचा वेळ, नवीन नियुक्त्यांवर सध्या बंदी

होणार नाही असे आश्वासन दिले. वापरकर्त्याकडून वक्फमध्ये कोणताही बदल होणार नाही, असेही न्यायालयाने म्हटले आहे. वक्फ कायद्याविरुद्ध न्यायालयात ७० हून अधिक याचिका दाखल झाल्या आहेत.

**न्यायालय फक्त पाच मुख्य आक्षेपांवर सुनावणी करेल.**

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, सुनावणी कोणत्या पाच मुद्द्यांवर होईल हे ठरवावे लागेल. ११०-१२० फायली वाचणे शक्य नाही. आक्षेपांचा निर्णय नोडल कौन्सिलमार्फत घ्यावा.

## यापुढे विद्यार्थ्यांची बायोमेट्रिक हजेरी

आणि महाविद्यालयीन शिक्षणाचा दर्जा सुधारणे आहे. काही विद्यार्थी महाविद्यालयाऐवजी खासगी शिकवणी वर्गांना जास्त उपस्थित राहतात, पण या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना महाविद्यालयात उपस्थित राहण्याचे महत्त्व समजेल. यामुळे शाळा-महाविद्यालयांमध्ये शिस्त राखली जाईल आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कार्य सुधारेल.

राज्य सरकारचा हा निर्णय विद्यार्थ्यांच्या शाळा आणि महाविद्यालयातील उपस्थितीत वाढ करेल. बायोमेट्रिक हजेरी प्रणाली लागू केल्याने विद्यार्थ्यांना नियमितपणे शाळा-महाविद्यालयात उपस्थित राहण्याची प्रेरणा मिळेल. महाविद्यालयांच्या माथी खर्चाची जबाबदारी असली तरी, हा निर्णय शाळेतील शिस्त आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या दर्जात सुधारणा होईल.

**शिक्षकांनाही बायोमेट्रिक अनिवार्य**

दरम्यान, राज्यातील अनुदानास पात्र शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती तत्काळ बायोमेट्रिक अथवा चेहरा ओळख प्रणालीद्वारे नोंदविण्याचे निर्देश शिक्षण विभागाने यापूर्वीच दिले आहेत. तसेच बायोमेट्रिक प्रणाली चेहरा ओळख प्रणालीद्वारे उपस्थितीची अट पूर्ण करण्यासाठी सर्व अंशतः अनुदानित शाळांना देण्यात आलेल्या मुदतीचे पालन न करणाऱ्या शाळांचे वेतन अनुदान रोखून ठेवण्यात येईल, असा इशाराही यापूर्वी देण्यात आलेला आहे.

## २४, २५ तारखेला सरपंच आरक्षण सोडती

तर ११९ ठिकाणी अनुसूचित जमातीसाठी आरक्षण राहणार असून यात ६० ठिकाणी महिला, तसेच १५० ठिकाणी अनुसूचित जाती प्रवर्गासाठी आरक्षण राहणार असून यात ७५ महिला सरपंच यांचा समावेश राहणार आहे.

याबाबतचे आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र यामध्ये ५ मार्च रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहे. यात जिल्ह्यात बिगर अनुसूचित क्षेत्रातील १२२३ ग्रामपंचायतमध्ये १५० ठिकाणी अनुसूचित जातीसाठी सरपंच पद आरक्षित राहणार असून यात ७५ महिलांचा समावेश राहणार आहे. ११९ ठिकाणी सरपंच पद अनुसूचित जमातीसाठी आरक्षित राहणार असून यात ६० महिलांचा समावेश राहणार आहे. ओबीसी प्रवर्गासाठी ३३० ठिकाणी सरपंच पद आरक्षित राहणार असून यात १६५ महिलांचा समावेश असणार आहे तर ६२४ ठिकाणी सरपंच पद हे खुल्या प्रवर्गासाठी राहणार असून यात ३१२ खुल्या प्रवर्गातील महिला सरपंचाचा समावेश राहणार आहे. दरम्यान, कोणत्या तालुक्यात कोणत्या गावात महिला, सर्वसाधारण आणि अनुसूचित जाती-जमातीचे आरक्षण निघणार याचा तपाशील जिल्हाधिकारी कार्यालयातील ग्रामपंचायत विभागाने तयार करून तो मान्यतेसाठी जिल्हाधिकारी यांना पाठवला आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया या कार्यक्रमाला मान्यता दिल्यानंतर २४ आणि २५ एप्रिलाला उपविभागीय पातळी आणि तहसील कार्यालय पातळीवर सरपंच पदाच्या सोडती काढण्यात येणार आहेत.

## तलाठ्याच्या नावाने लाच घेणाऱ्या पत्रकाराला पकडले

स्वीकारताना नाशिकच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. कारवाई नंतर शेख याने ढोकळे यांना फोनवरुन पैसे दिले असल्याचे सांगितले, तेव्हा उद्या बघू असे म्हणून तलाठ्याने लाचेच्या रकमेस संमती दर्शवून प्रोत्साहन दिले. या पथकात पोलीस उपअधीक्षक एकनाथ पाटील, पोहेकॉ. सुनील पवार, पोना. योगेश साळवे व परशुराम जाधव यांचा समावेश होता. याप्रकरणी घारगाव पोलिसांत पत्रकार रमजान शेख व कामगार तलाठी अक्षय ढोकळे यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

## शरद पवार-अजित पवार पुन्हा एकाच व्यासपीठावर येणार

येत असल्याने दोन्ही पक्षाचे नेते आणि कार्यकर्ते संभ्रमात पडले आहे. पुणे येथील साखर परिषदच्या बैठकीत उस उत्पादक शेतकरी आणि साखर उत्पादक कारखानदार यांना योग्य दर आणि सोयीसुविधा बाबत चर्चा केली जाते.

भविष्यातील उस उत्पादन आणि साखर उत्पादनवर विशेष चर्चा केली जाते. शेतकरीला मिळालेला भाव आणि साखरला उपलब्ध असलेली बाजारपेठ यामध्ये समन्वय साधला जाण्यासाठी चर्चा करून एक रणनीती तयार केली जाते. दरम्यान शरद पवार आणि अजित पवार या बैठकीत एकत्र बसून का चर्चा करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. २१ एप्रिल रोजी पार पडणाऱ्या शरद पवार आणि अजित पवार बैठकीकडे महायुती पक्षातील नेत्यांचे लक्ष लागले आहे.

## नवीन धोरणानुसार १३ वाळूपट्ट्यांचा लिलाव

सुरू होणार असून या काळात वाळू बंदी राहणार असल्याने नवीन धोरणावर कधी अंमलबजावणी होणार हा प्रश्न आहे. गतवर्षी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमुळे जिल्ह्यातील वाळू उपशाला ब्रेक लागला होता. पर्यावरण विभागाची मान्यता मिळू शकली नाही. यामुळे लिलाव प्रक्रिया बरेच दिवस रखडली. यामुळे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीच्या अनेक घटना उघड झाल्या होत्या. अधिकाऱ्यांवर माफियांकडून हल्ले झाल्याच्या घटना घडल्याचे दिसून आले होते. २०२३ साली तत्कालीन महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी नवीन वाळू धोरण आणले होते. या धोरणानुसार प्रत्येक जिल्ह्यात वाळू डेपो तयार करण्यात आले होते. या डेपोतून वाळूची विक्री केली जात होती. जिल्ह्यात सध्या १८ वाळू डेपो कार्यरत असून २४ ते २५ हजार ब्रास वाळू साठा आहे. या डेपोतून जुन्या धोरणानुसार वाळूची विक्री केली जात आहे. दरम्यान, त्या काळातील दोन डेपो रद्द करण्यात आले असून सरकारच्या धोरणामुळे चोरट्या मार्गाने वाळू तस्करी जोर असल्याची चर्चा आहे.

**नवीन वाळूसाठी दिवाळीचा मुहूर्त?**

जिल्ह्यात मुळा, प्रवरा, गोदावरी, घोड आणि भीमा हे महत्त्वाचे नदी पात्र आहेत. पहिल्या टप्प्यात कर्जत, राहुरी आणि पारनेर तालुक्यातील १३ वाळू पट्ट्यांचा नवीन धोरणानुसार, लिलाव करण्यात येणार आहे. येत्या काही दिवसांत १३ वाळू पट्ट्यांची निविदा प्रसिद्ध करण्यात येणार आहे. नवीन धोरणानुसार, लिलाव होणार आहेत. परंतु उर्वरित वाळू पट्ट्यांची निविदा प्रक्रिया राबण्यासाठी शासनाकडे केवळ एक महिन्यांचा कालावधी बाकी आहे. जून ते सप्टेंबर दरम्यान वाळू उपसा केला जात नाही. यामुळे सरकारच्या सुधारित धोरणामुळे दिवाळीच्या दरम्यान शासकीय वाळू मिळणार असल्याची शक्यता व्यक्त होत आहे.